ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, ISSUE– IV JULY – AUGUST 2022

Original Research Article

संदेश देऊन, भारतीय समाज मनामध्ये नवचैतन्य भरण्याचे काम केले. त्यांनी अध्यात्म, ज्ञान, विज्ञान, भारतीय व पाश्चिमात्य संस्कृती, शिक्षण यामध्ये संवादी सकारात्मक समन्वय साधण्याचे महान कार्य केले. आजही स्वामी विवेकानंदांचे विचार भारतीयांना प्रेरणादायी ठरतात.

**की वर्ड: स्वामी विवेकानंद**

12 जानेवारी 1863 ते 4 जुलै 1902 या कालावधीमध्ये होऊन गेलेले महान भारतीय विचारवंत.

**शैक्षणिक विचार:**

शिक्षणाची व्याप्ती व मर्यादा शिक्षणाचा अर्थ शिक्षणाबाबतचा दृष्टिकोन, संपूर्ण शिक्षण प्रक्रिया, शिक्षण प्रक्रियेचे घटक व शिक्षणाची उद्दिष्टे या सर्व मुद्यांबाबत मांडलेले विचार.

**स्वामी विवेकानंद यांच्या शैक्षणिक विचारांची आजच्या शिक्षणात गरज:**

❖ शिक्षणाबाबतचा व्यापक दृष्टिकोन स्पष्ट करण्यासाठी.

❖ पाश्चात्त्यांचे अंधानुकरण टाळण्यासाठी.

❖ भारतीय समाज व विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वासाची निर्मिती करण्यासाठी.

❖ व्यक्तिमत्व विकासात चारित्र्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी.

❖ प्राचीनता नावीन्य व आधुनिकता यांचा योग्य समन्वय साधून स्व विकास घडवून आणण्यासाठी.

❖ शिक्षणातील मातृभाषेचे महत्त्व विशद करण्यासाठी.

❖ संस्कृती रक्षण व संवर्धनासाठी समाजाच्या सर्व स्तरात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी.

❖ निकोप मनाचे व निकोप शरीरस्वस्थ याचे महत्त्व पटवून देण्यासाठी.

❖ शिक्षक, विद्यार्थी, पालक यांना शिक्षणाबाबतचा व्यापक दृष्टी देण्यासाठी.

**स्वामी विवेकानंद यांच्या शैक्षणिक विचारांचे आजच्या शिक्षणात महत्व:**

❖ स्वामी विवेकानंदांनी मांडलेले शैक्षणिक विचार बालकांचा बौद्धिक, मानसिक, शारीरिक, भावनिक तसेच क्रियात्मक विकास करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात.

❖ स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक विचार समाज, संस्कृती, धर्म, विज्ञान, शिक्षणास सदैव प्रेरणा, स्फूर्ती, नवसंजीवनी देण्याचे कार्य करतात.

❖ ज्ञानप्राप्तीसाठी मन प्रधान असून मनाची एकाग्रता खूप गरजेची आहे मनाच्या एकाग्रतेसाठी शील सदाचाराची

आवश्यकता असते हा विचार विद्यार्थ्यांना नैतिक व मूल्याधिष्ठित बनवितो.

- ❖ स्वभाषेतून दिलेल्या शिक्षणाने ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात तसेच विद्यार्थ्यांच्या विचार क्षमतेत वाढ होऊन मूलभूत संकल्पना अधिक दृढ होऊन त्या चिरकाळ स्मरणात राहतात असा मौलिक विचार आजही उपयुक्त ठरतो.
- ❖ शिक्षणात श्रद्धेला खूप महत्त्व आहे. शिक्षक व विद्यार्थ्यांची एकमेकांवर श्रद्धा विश्वास असायला हवा. एकमेकांच्या विश्वासातून अर्थपूर्ण शिक्षण होते असेही स्वामी विवेकानंदांनी सांगितले.
- ❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ज्ञानदान करताना कोणत्याही प्रकारचा भेदभाव करू नये असा विचार स्वामी विवेकानंदांनी मांडला. हा विचार सामाजिक समानता व समता प्रस्थापित करण्याचे कार्य करतो.
- ❖ विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता लक्षात घेऊन विद्यार्थ्यांच्या पातळीवर येऊन शिक्षकांनी अध्यापन केले पाहिजे हे स्वामी विवेकानंदांनी सांगितले.
- ❖ शिक्षक स्वतः सदाचारी शीलवान असेल तरच विद्यार्थी शिक्षकांचे ऐकतात असा महत्त्वाचा संदेश विवेकानंदांनी दिलेला आहे.
- ❖ ज्ञानदान करताना शिक्षकांनी विद्यार्थ्यांची बौध्दिक क्षमता त्यांची आवड, कल विचारात घेऊन ज्ञानदान केले पाहिजे असा मौलिक विचार विवेकानंदांनी मांडलेला आहे.
- ❖ पालकांनी स्वतःच्या पाल्याकडून अवास्तव अपेक्षा ठेवू नयेत. त्यांना सतत दोष देऊ नये. पाल्याचा आत्मविश्वास वाढेल, त्यांना प्रेरणा मिळेल नवीन गोष्टी शिकण्यास हुरूप येईल अशा सकारात्मक प्रेरणादायी शब्दांचा प्रयोग करावा असा महत्त्वपूर्ण सल्ला स्वामी विवेकानंदांनी पालकांना दिलेला आहे.
- ❖ स्त्रियांना शिक्षण देणाऱ्या देशाचा झपाट्याने विकास होतो हा स्वामी विवेकानंदांनी मांडलेला स्त्री शिक्षणाचा विचार स्त्री सबलीकरणास प्रोत्साहन देतो.
- ❖ आपले राष्ट्र खेड्यात, झोपड्या झोपड्यात वसलेले आहे. तळागाळातील लोकांना शिक्षणापर्यंत देता येत नसेल तर शिक्षणाने तळागाळातील लोकांपर्यंत जाण्याचे काम केले पाहिजे असा सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा विचार स्वामी विवेकानंदांनी मांडलेला आहे.

**स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक विचार शिक्षक-पालक, विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी उपक्रम:**

- ❖ धार्मिक तेढ व संकुचित वृत्ती नष्ट करण्यासाठी सर्व धर्मीयांचे सण समारंभ उत्सव साजरे केले जावेत.
- ❖ फक्त नवे ते स्वीकारणे योग्य व जुने टाकाऊ हा विचार पुसून टाकण्यासाठी, संस्कृती संक्रमण संवर्धन रक्षणासाठी

व पाश्चिमात्य संस्कृती समन्वय साधण्यासाठी युवक आदान-प्रदान (युथ एक्सचेंज) कार्यक्रमा चे वेळोवेळी आयोजन केले जावे.

- शिक्षकांनी व्यक्तीभेद विचारात घेऊन अध्ययनात मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गरजेनुसार उपचारात्मक अध्यापन याचे नियोजन करावे. हुशार प्रतिभावान विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शनाचे आयोजन करावे.
- ज्ञानप्राप्तीसाठी एकाग्रतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी वेळोवेळी ध्यानसाधना शिबिराचे आयोजन करावे.
- शिक्षक पालकांनी विद्यार्थ्यांना मुक्त आनंददायी मार्गाने शिकण्यासाठी सकारात्मक वातावरणाची निर्मिती करून द्यावी.
- ज्ञान साधनेबरोबर शरीर साधनानाही तितकीच महत्त्वाची आहे हे सांगून विद्यार्थ्यांना व्यायामाचे, योगाचे महत्व पटवून द्यावे.
- विविध व्यसनांपासून दूर राहून, मनावर ताबा ठेवून ब्रह्मचर्याचे पालन केल्यास उत्कृष्ट प्रकारे विद्यार्जन होऊन जीवन यशस्वी होते हा मौलिक विचार विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविण्यात यावा.
- आपल्या यश अपयशासाठी आपण स्वतः जबाबदार असतो त्यामुळे आपण आपल्या स्वकर्तुत्वावर विश्वास ठेवून सदैव सदाचाराचा मार्ग स्वीकारावा हे विद्यार्थ्यांना उदाहरणांद्वारे पटवून द्यावे.
- आपण दैववादी न राहता प्रयत्नवादी असायला हवे. प्रयत्न करीत राहिल्यास, आपली ध्येय साध्य होतात हे विद्यार्थ्यांना सांगावे. आत्मविश्वास ढळू देऊ नये, स्वतःमध्ये न्यूनगंड निर्माण होऊ देऊ नये. आपण स्वतः आपले विचार, बोलणे, वागणे याबाबत सदैव सकारात्मक असावे हे विद्यार्थ्यांना वारंवार सांगावे.
- आपल्या स्वतःमध्ये निसर्गतः मोठ्या प्रमाणात अनेक सुप्त क्षमता असतात या सुप्त क्षमतांबाबत आपण जागरूक राहून, त्या सुप्त क्षमतांचा विकास करून घेतला पाहिजे हा विचार शिक्षक व पालकांनी विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवला पाहिजे.
- तू हे करू शकणार नाहीस. तुला ते जमणारच नाही. तुझी ती लायकीच नाही. तू ढ मठ्ठ आहेस अशा नाऊमेद करणाऱ्या शब्दांचा प्रयोग शिक्षक व पालकांनी कधीही नये तसे केल्यास विद्यार्थ्यांमधील नैसर्गिक क्षमता आपोआप आटत जातात व विद्यार्थ्यांमध्ये भीती, नैराश्य व न्यूनगंड निर्माण होतो.
- शाळा महाविद्यालय समाजामध्ये वंचित स्त्रिया मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन करून स्त्री सबलीकरणास प्रोत्साहन द्यावे यामुळे मुलांच्या मनात मुली व स्त्रियांबाबत आदराची भावना निर्माण होईल.

**संदर्भ:**

Banhatti, G. (1995). Life and Philosophy of Swami Vivekananda. of Swami Vivekananda. Atlantic

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–IX, ISSUE– IV

JULY – AUGUST 2022

Original Research Article

Publishers & Distributors.

Sharma, R. (2014). Educational Philosophy of India. Shubhi Publications, Gurgaon.

रामकृष्ण मठ, (2005). श्री राम कृष्ण शिवानंद स्मृती ग्रंथमाला. प्रकाशन विभाग, नागपूर.

पारसनीस, न. (2005). शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका. नूतन प्रकाशन, पुणे.

कुंडले, म.(1990). शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र. श्री विद्या प्रकाशन, पुणे.

*Cite This Article:*

** डॉ. शाम रणदिवे (2022* स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक विचार व आजचे शिक्षण, ***Educreator Research Journal, Volume–IX, Issue– IV,*** *July – August 2022, 109-113.*